# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

**संदर्भ** :- विद्यापीठ कार्यालयाचे १.जा.क्र.शिवाजी विद्या./नॅक/आय.क्यु.ए.सी./१६०, दि.३१ डिसेंबर, २०१५ व २. संदर्भ क्र.संलग्नता/टी-२/१३२, दि.२६ सप्टेंबर,२०१६ चे परिपत्रक.

विद्यापीठाने सर्व संलग्नीत महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था यांना उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या परिपत्रकाद्वारे ०१ जानेवारी, २०१६ पासून विद्यापीठाद्वारे सर्व प्रकारचा पत्र व्यवहार ई-मेलद्वारे केला जाईल असे कळविले असून प्रत्येक महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थेस स्वतंत्र ई-मेल आयडी उपलब्ध करून दिला आहे.

त्यायोगे विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांना महाराष्ट्र शासन, विद्यापीठ अनुदान आयोग, विविध शिखर संस्था, विद्यापीठ अधिकार मंडळांनी घेतलेले निर्णय व अन्य स्त्रोतांकडून प्राप्त झालेली परिपत्रके/पत्रे इ. माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी विद्यापीठाने पुरविलेल्या ई-मेल आयडीवरच पाठविण्यात येतात. यामधील काही माहिती **'तात्काळ'** या सदरामधील असते. तथापि, सदरची परिपत्रके/पत्रे पाठवून व दुरध्वनी करून देखील सदरची अपेक्षीत माहिती विद्यापीठास प्राप्त होत नाही.

यापूर्वी या कार्यालयाच्या संदर्भ क्र.संलग्नता/टी-२/१३२, दि.२६ सप्टेंबर,२०१६ रोजीच्या परिपत्रकान्वये संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांना विद्यापीठामार्फत पुरविल्या गेलेल्या ई-मेलआयडीवरच परिपत्रके/पत्रे पाठविण्यात येणार असल्याबाबत व विद्यापीठ संकेतस्थळ व ई-मेलचा inbox पाहून कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच, विद्यापीठामार्फत मागणी केलेली माहिती विहित मुदतीत प्राप्त झाली नाही तर गंभीर दखल घेण्यात येईल असेही कळविण्यात आलेले होते. परंतु अद्यापही काही महाविद्यालयांकडून मागणी केलेली माहिती विहित मुदतीत प्राप्त होत नाही असे निदर्शनास आले आहे. परिणामी विद्यापीठ कार्यालयाकडून अपेक्षीत असणारी पुढील कार्यवाही पुर्ण होऊ शकत नाही.

म्हणजेच संबंधीत महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था या विद्यापीठाने पत्रे/परिपत्रके याद्वारे दिलेल्या आदेशाचे पालन करीत नसून, ही बाब अतिशय गंभीर स्वरूपाची आहे. सबब, विद्यापीठाकडून वेळोवेळी पाठविण्यात आलेल्या पत्रे/परिपत्रकांच्या अनुषंगाने ज्या महाविद्यालयांनी/मान्यताप्राप्त संस्थांनी अद्यापही माहिती पाठविलेली नाही अथवा भविष्यात विद्यापीठाकडून पाठविल्या जाणा-या पत्रे/परिपत्रके इ. च्या अनुषंगाने जी महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था अपेक्षीत कार्यवाही करणार नाहीत त्या महाविद्यालयांचे संलग्नीकरण, प्रवेश पात्रता, परिक्षेचे कामकाज इ. बाबतची पुढील कार्यवाही थांबविण्यात येईल, यांची गांभिर्याने नोंद घ्यावी.

कळावे,

संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

संदर्भ क्र.संलग्नता/टी-२/ २०६
दि. 10 FEB 2017

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.